

थेरगावात बालजत्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 19/11/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 271 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# राज्याच्या जलसंपदा विभागाचा राष्ट्रपतींकडून गौरव!

## मंत्री राधाकृष्ण विखे यांनी स्वीकारला पुरस्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने राज्याच्या जलसंपदा विभागाला 'बेस्ट स्टेट कॅटेगरी-२०२४' मध्ये प्रथम क्रमांकाच्या मानाच्या पुरस्काराचे वितरण दिल्लीत मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी हा पुरस्कार स्विकारला.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २०२४ साली जलसंपदा विभागाची जबाबदारी होती. त्यांच्या कार्यकाळात विभागाने राज्याच्या जलव्यवस्थापन आणि सिंचन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्र राज्याचा सन्मान प्राप्त झाला आहे.

जलसंपदा विभागाच्या यशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून होत असलेले नियोजन तसेच अतिशय पारदर्शकता, तांत्रिक सुधारणा आणि निर्धारीत वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर विशेष भर दिला.

धरण सुरक्षा, जलसंवर्धन सिंचन प्रकल्पांना गती आणि जलस्त्रोतांचा योग्य वापर यासर्व कामासाठी घेतलेल्या निर्णयाबद्दल महाराष्ट्राला केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने सन्मानित केल्याचे विखे यांनी सांगितले.

मंत्री विखे यांनी सांगितले की, जलसंपदा विभागाच्या यशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले नियोजन तसेच पारदर्शकता, तांत्रिक सुधारणा आणि निर्धारीत वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर विशेष भर दिला आहे.

धरण सुरक्षा, जलसंवर्धन सिंचन प्रकल्पांना गती आणि जलस्त्रोतांचा योग्य वापर होत असल्याने उत्तर आहिल्यानगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या निळवंडे धरण व कालवे पुर्ण झाल्याने जिरायत भागातील शेतकऱ्यांचे ५० वर्षांचे स्वप्न प्रत्यक्षात साकारल्याने जिरायत शेतीला मोठा फायदा झाला.

# राष्ट्रवादीच्या समन्वयक पदी विलास लांडे

## कार्याध्यक्ष पदी विजय लोखंडे यांची नियुक्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला पुन्हा काबिज करण्याकरिता व तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात राज्यात होणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणकांच्या दृष्टीने जिल्हा समन्वय व नियोजन करण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे पिंपरी चिंचवड शहराकरिता मा.आमदार श्री.विलास लांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

तसेच मा.सभापती, शिक्षण मंडळ श्री.विजय लोखंडे यांची पिंपरी–चिंचवड शहर कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे.

पिंपरी–चिंचवड महानगरपालिका 2025-2026 निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारी साठी मा. अजितदादा पवार व पक्षाचे विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहचविण्याचे यशस्वी प्रयत्न करतील असे नियुक्तीची माहिती देताना शहराध्यक्ष योगेश बहल यांनी विश्वास व्यक्त केला आहे तसेच यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत,





दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 19/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अण्णा जोगदंड यांना "भारत भूषण पुरस्कार"

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशने रविवारी ,भारत इतिहास संशोधन मंडळ येथे सिने अभिनेत्री मृणाली कुलकर्णी प्रा.डॉ.शंकर आदनी यांच्या हस्ते भारत भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले,दोन महिन्यापूर्वी संस्थेच्या वतीने नामांकन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते.**



आतापर्यंत जोगदंड यांनी पर्यावरण,साहित्य,शैक्षणिक,सामाजिक, आरोग्य,संस्कृतिक अशा विविध क्षेत्रात जवळपास 7000 समाजउपयोगी जनजागृतीपर कार्यक्रम घेतले असुन महाराष्ट्र शासनाचे गुणवंत कामगार पुरस्कार मिळवणारे हे राज्यातील दुसरे तर पुणे जिल्ह्यातील पहिले दांपत्य ठरलेले आहे,आतापर्यंत एकूण त्यांना 80 वेगवेगळ्या सामाजिक संस्था,प्रतिष्ठान, राजकीय पक्ष, तसेच राज्य शासनाचे पुरस्कार मिळालेले असून अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून पिंपरी चिंचवड शहराला परिचित आहे,यावेळी पुरस्काराला उत्तर देताना शहराध्यक्ष यांना जोगदंड म्हणाले की मला समाजाचे काहीतरी देणे आहे आणि ते मी दिले पाहिजे या उदात्य भावनेतून मी झपाटल्यासारखे सामाजिक काम करत आहे.सौ ज्योती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सचिन हळदे यांच्यासह निवड समितीने जो माझ्यावर विश्वास दाखवला त्याच्या विश्वासाला मी तडा चला जाऊ देणार नाही अशी त्यांनी ग्वाही दिली ,माझ्या सामाजिक कार्याला प्रसिद्ध देणाऱ्या मीडियाचे पण त्यांनी भरभरून कौतुक केले

त्यांनी बातमी रुपी मला नेहमीच माझे मनोधैर्य वाढवले हा पुरस्कार माझा वैयक्तिक नसून आपणा सर्वांचा आहे असे जोगदंड यावेळी म्हणाले .यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन हळदे, अण्णा जोगदंड ,पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड ,साई इंडियन ट्रस्ट असोसिएशन दिल्लीचे अध्यक्ष डॉ शंकर अदानी ,पोलीस उपनिरीक्षक पूनम पाटील,आभिनेत्री मृणाली कुलकर्णी, सिने आभिनेता युवराज कुमार ,अभिनेत्री केतकी गावडे, सचिव, दिपक राणे ,मुख्य आयोजक दिगंबर गरुड ,उपाध्यक्ष विकास उबाळे,लेखिका वैशाली शेलार,ज्येष्ठ साहित्यिक डॉ. उल्हास मोगलेवार ,दिनेश खैरे,यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते ,प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष सचिन हळदे यांनी केले तर आभार उपाध्यक्ष विकास उबाळे यांनी मांनले आणि सूत्रसंचालन जेष्ट कवी उमाकांत आदमाने माधुरी राऊत यांनी केले.

# कांदा लागवडीला वेग

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**इंदापूर तालुक्यातील निमसाखर गाव परिसरात सध्या पाच महिन्याच्या कांद्याची लागवड जोरात सुरू आहे. शेतकऱ्यांनी फेक कांदा विस्कटून नव्याने रोपे टाकण्याचे काम वेगाने सुरू केले असून, सकाळपासून शेतात मोठ्या प्रमाणावर मजूरदेखील कामाला लागले आहेत.**



या वर्षी पावसाचा अनियमित पॅटर्न आणि बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांनी कांदा लागवडीचे वेळापत्रक थोडे पुढे ढकलले होते. आता जमिनीची ओल आणि हवामानाची स्थिती अनुकूल झाल्यामुळे पाच महिन्याच्या कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जात आहे. शेतकरी सांगतात की, योग्य वेळी लागवड झाल्यास उत्पादन चांगले मिळण्याची शक्यता अधिक असते अशी माहिती निमसाखरचे शेतकरी श्री युवराज सर्जेराव रणमोडे यांनी दिली त्यांनी हेही सांगितले की आमच्या परिसरामध्ये श्री राजाराम बाबुराव दळवी हे अत्यंत चांगल्या पद्धतीने कांदा बी विस्कटून देतात. कांद्याची उगवण समान होते.काही शेतकऱ्यांनी ड्रिप सिंचनाचा वापर सुरू केला असून त्यामुळे पाण्याची बचत तसेच कांद्याच्या वाढीवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तर दुसरीकडे, बाजारभावातील चढ-उतारामुळे शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात चिंता दिसून येत असली तरी उत्पादन चांगले मिळाले तर परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

निमसाखर व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून सध्या कांदा रोपांची लावणी पूर्ण क्षमतेने सुरू आहे.

# मुख्याध्यापकांसाठी संविधान विषयक व्याख्यान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर आणि जागरूकता वाढविण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने बांधील राहिले पाहिजे,संविधान हा राष्ट्रग्रंथ असून हा भाव प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात दृढ करावा, असे प्रतिपादन संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संविधान दिन (२६ नोव्हेंबर) पार्श्वभूमीवर महापालिका शाळांतील सर्व मुख्याध्यापकांसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन चिंचवड स्टेशन येथील ऑटो क्लस्टर येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमास महापालिका उपायुक्त अण्णा बोदडे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहायक प्रशासन अधिकारी रजिया खान, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, महापालिकेच्या विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सामूहिक वाचनाच्या माध्यमातून संविधानातील मूल्ये, तत्त्वे आणि नागरिकांच्या कर्तव्यांची जाणीव पुनः अधोरेखित करण्यात आली. त्यानंतर संविधान अभ्यासक पठाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संविधान म्हणजे काय, नागरिकांचा संविधानाशी असलेला संबंध, दैनंदिन जीवनातील संविधानाचे स्थान आणि महत्त्व, संविधानाचा उपयोग, तसेच स्वातंत्र्य संग्रामातील राजकीय, सामाजिक आणि सामाजिक लढा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मसुदा समितीचे योगदान, तसेच भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये यांचेही त्यांनी सखोल विश्लेषण केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर प्रास्ताविक प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी केले.

"भारतीय संविधान या देशातील चरा चराचे संरक्षण व संवर्धन करणारे आहे. संविधानातील मूल्ये ही केवळ अभ्यासाचा भाग नसून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन वर्तनात दिसली पाहिजेत. शिक्षकांनी या मूल्यांची बीजे विद्यार्थ्यांच्या मनात रोवली, तर समाजातील लोकशाही संस्कार अधिक दृढ होतील."

**अण्णा बोदडे,**
उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पिंपरीत दाम्पत्याची दोन कोटींची आर्थिक फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : सिमकार्डवर २० तक्रारी आल्याचे सांगून आणि मनी लॉन्ड्रिंगच्या गुन्ह्यात अटकेची भीती दाखवून दाम्पत्याची दोन कोटी १४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार निगडी प्राधिकरण परिसरात उघडकीस आला. या प्रकरणी पोलिसांनी पाच मोबाइल नंबरवरून बोलणाऱ्या आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.**




याबाबत ७० वर्षीय जेष्ठ नागरिकाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी पोलीस अधिकारी असल्याचे सांगून या दांपत्याला फोन केला. त्यांच्या पत्नीच्या नावाने घेतलेल्या सिमकार्डवर २० गुन्हे झाल्याचे, मनी लॉन्ड्रिंगमध्ये त्यांचा सहभाग असल्याचे सांगत दहशत निर्माण केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाचे बनावट आदेश, पीडीएफ फाइल पाठवत पडताळणीच्या (व्हेरिफिकेशन) निमित्ताने विविध बँक खात्यांमध्ये दोन कोटी १४ लाख रुपय ७० हजार ३५८ रुपये भरण्यास भाग पाडले. या प्रकरणी सायबर पोलीस तपास करत आहेत.रुग्णांच्या नावाने बनावट विमा कागदपत्र तयार करून ती विमा कंपनीला सादर केली.

त्यानुसार विमा कंपनीकडून २२ लाख ९६ हजार रुपये घेत फसवणूक केली. ही घटना तळेगाव दाभाडे परिसरातील एका रुग्णालयात घडली.

याप्रकरणी दोन डॉक्टरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ३६ वर्षीय डॉक्टरने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 19/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# थेरगावात बालजत्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद

## दहा हजार मुलांनी घेतला लाभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवड शहर युवा सेना व विश्वजीत बारणे यांच्या सहकार्यातून बालदिनानिमित्त आयोजित तीनदिवसीय बालजत्रा, मनोरंजन नगरीला परिसरातील बालक, पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या तीन दिवसामध्ये दहा हजार मुलांनी या बालजत्रेचा आनंद घेतला. बालचमुंनी विविध खेळांचा आनंद लुटला. थेरगावातील पद्मजी पेपर मिल शेजारी १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान बालजत्रा पार पडली.**



खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते जत्रेचे उद्घाटन झाले. युवा सेना पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचारणे, लोकसभा युवा सेना अध्यक्ष राजेंद्र तरस, युवती सेना जिल्हाप्रमुख सायली साळवी, युवती सेना शहरप्रमुख रितू कांबळे, शहर युवा सेना प्रमुख माऊली जगताप, माजी नगरसेवक निलेश बारणे, माजी नगरसेविका विमल जगताप, महिला संघटिका सरिता साने, उपजिल्हाप्रमुख दिलीप पांढारकर, नाना पारखे, शैलाताई निकम, सोशल मिडीयाच्या श्वेता कापसे ,रोहिणी नवले, संगीता कदम, नारायण लांडगे, हनुमंत माळी, धनाजी बारणे, नंदू उर्फ शरद जाधव, तानाजी बारणे, दिपक गुजर, बलभिम पवार तसेच मोठ्या संख्येने युवा सैनिक व परिसरातील लहान मुले व नागरिक हे मोठ्या संखेने उपस्थित होते.पश्चिम महाराष्ट्र युवासेनेचे प्रमुख विश्वजीत बारणे म्हणाले की, "भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचा जन्म दिवस १४ नोव्हेंबर हा बाल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त मुलांना आनंद लुटण्यासाठी बालजत्रेचे आयोजन करण्यात आले होते.

मुलांनी झुकझुक गाडी ,पाण्याची बोट, जादूचे प्रयोग ,पाळणे ,मिकी माउस ,छोटा मोठा पाळणा , सेल्फी पॉइट या खेळण्यातील वस्तूचा आनंद घेतला. थेरगाव परिसरातील पालक, बालकांनी मोठ्या संख्येने जत्रेत सहभाग घेतला.

मुलांनी भरभरून जत्रेचा आनंद घेतला. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह खरंच ऊर्जा देणारा होता. या तीन दिवसामध्ये जवळपास ८ ते १० हजार मुलांनी या बालजत्रेचा आनंद घेतला.

# आंद्रा-भामा आसखेड दिरंगाईविरोधात 'आप'चा तीव्र निषेध!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरात दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टी – पिंपरी-चिंचवड तर्फे मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. शहराच्या जीवनवाहिनी ठरणाऱ्या आंद्रा व भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेतील प्रचंड दिरंगाई आणि वाढीव खर्चाबद्दल आम आदमी पार्टीने तीव्र नाराजी व्यक्त केली.**




वारंवार मुदतवाढ देऊनही योजना अपूर्णच राहिली असून, अनेक प्रभागातील नागरिकांना गंभीर पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सर्वात धक्कादायक बाब अशी की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेला अर्धवट काम असतानाही सलग चौथी मुदतवाढ देण्यात आली आहे आणि ₹९ कोटी ३१ लाख रुपये वाढीव खर्च म्हणून देण्यात आले आहेत.आम आदमी पार्टीच्या मते, हा वाढीव खर्च म्हणजे नागरिकांच्या कराच्या पैशांचा सरळसरळ अपव्यय आणि मनपा प्रशासनाचा गंभीर निष्काळजीपणा आहे.

**आम आदमी पार्टीच्या तीन प्रमुख मागण्या-**

1 उच्च-स्तरीय चौकशी समितीची तात्काळ नियुक्ती

2 वाढीव खर्च व निर्णयप्रक्रियेची सखोल तपासणी

3 योजना पूर्ण करण्यासाठी ठोस, बंधनकारक आणि अंतिम कालमर्यादा जाहीर करणे.

4 दिरंगाईस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि प्रकल्प सल्लागार संस्थेवर तात्काळ कडक शिस्तभंगात्मक कारवाई करणे.

या प्रसंगी आम आदमी पार्टी पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष श्री. रविराज काळे म्हणाले,"जी योजना शहराला सुरक्षित आणि पुरेसा पाणीपुरवठा देण्यासाठी होती, तीच योजना मनपाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवनाला धोका निर्माण करत आहे. दिरंगाई, वाढीव खर्च आणि गैरव्यवहाराची साखळी थांबवण्यासाठी तातडीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे."आम आदमी पार्टी – पिंपरी-चिंचवडने स्पष्ट इशारा दिला आहे की, मनपा प्रशासनाने तातडीने जबाबदारांवर निर्णायक कार्यवाही केली नाही, तर नागरिकांना घेऊन मोठ्या प्रमाणात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734